[२] उत्पन्नाची अट :–

खालील मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असल्यास कर्मचा-याच्या कुटुंबातील कोणीही अवलंबित व्यक्ती अनुकंपा तत्वावर नोकरी मिळविण्यास पात्र ठरणार नाही.

"संबंधित मृत कर्मचा-याच्या कुटुंबियास कर्मचारी गट विमा योजना, अंशदायी भविष्य निर्वाह निधीतील बचत आणि ठेव संलग्न विमा योजनेद्वारे मिळणारी रक्कम आणि मृत्यु-नि-सेवा निवृत्ती उपदान या योजनेनुसार मिळणारी एकूण रक्कम रु. ४,००,०००/– [रुपये चार लाख फक्त] पेक्षा जास्त असेल तर

– किंवा –

संबंधित कर्मचा-याच्या कुटुंबियास अकाली सेवानिवृत्तीच्या / मृत्यूच्या दिवशी निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतन व स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह सर्व मार्गांनी मिळणारे एकूण मासिक उत्पन्न रु. १,२०० + १,२०० इतके निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतनावर सदर दिवशी मिळणारी महागाई वाढ यापेक्षा जास्त असेल तर [या संदर्भात एकूण मासिक उत्पन्न कशा प्रकारे काढावे याबाबतची उदाहरणे दर्शविणारे शासकीय परिपत्रक सोबत जोडले आहे.]

टिप: १. सरकारी कर्ज, सहकारी संस्था, बँका इत्यादींचे देणे यासारखी वैयक्तिक देणी संबंधित दिवंगत, अकाली सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या कुटुंबास मिळणा-या एकूण रु.४,००,०००/– या रकमेतून वजा करता येणार नाही.

टिप: २. "कुटुंब" या संज्ञेमध्ये कर्मचा-याची पत्नी/पती, मुले, अविवाहीत मुली तसेच कर्मचा-यांचा मृत्यू पूर्वी / अकाली सेवानिवृत्ती पूर्वी कायदेशिर रित्या दत्तक घेतलेला मुलगा/अविवाहीत मुलगी व त्यांच्यावर अवलंबुन असणारा अविवाहीत भाऊ, अविवाहीत बहीण यांचा समावेश होतो.

[३] अनुकंपा तत्वावर नेमणूका देण्यासाठी संबंधित कर्मचा-यांच्या अवलंबितांना नोकरी देतांना सर्व मार्गांनी मिळणारे कुटुंबाचे मासिक उत्पन्नाची शहानिशा करण्याचे काम सुरक्षा शाखेमार्फत करण्याची आवश्यकता नाही. उत्पन्नाच्या पुराव्यासाठी संबंधित अवलंबितांना आपल्या मासिक उत्पन्नाबाबत [दिलेल्या नमुन्यात] ॲफिडेव्हीटच्याद्वारे करुन त्यावर तहसिलदार/कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर सही करुन महामंडळास सादर करावे लागेल. सदर ॲफिडेव्हीटचा नमुना सोबत जोडला आहे.

[४] उपरोक्त २ ३–अ–२ मधील आर्थिक उत्पन्न मर्यादेसंबंधी "खास बाब" म्हणून विचार करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

[५] अनुकंपा तत्वावरील नेमणुका या फक्त वर्ग–३ घटक संवर्ग [Unit Cadre ] व वर्ग–४ पदामध्ये देण्यात येतील.

[६] रा. प. कर्मचा-याची पत्नी/किंवा विधवा/मुलगा किंवा अविवाहीत मुलगी यांचा अनुकंपा तत्वावर नेमणुकीसाठी विचार करण्यात येईल. मात्र रा. प. कर्मचा-याच्या विधवेने पुर्नविवाह केल्यास ती या योजनेनुसार नेमणूकीस पात्र राहणार नाही.

[७] या अवलंबितांपैकी कोणीही नोकरी करण्याच्या विहित अटी पूर्ण करीत नसेल व संबंधित कर्मचा-याची पत्नी/विधवा/मुलगा/मुलगी यांनी तसे ॲफिडेव्हीट दिल्यास मृत्यु/अपात्र कर्मचा-याच्या त्यांच्यावर संपूर्ण अवलंबुन असलेल्या एका भावास या नेमणूकीसाठी अर्ज करता येईल.

....३